







शहर सोडून ते कुठे जात आहेत
हे विचारु नका
कदाचित प्रत्येकाला जायचे असते
त्याच वाटेने तेही निघालेले असतील
पण त्यांचा असा समज आहे
की आताच्या वणव्यात जे होरपळले
ते आपण नव्हतो हे केवढं सुदैव...
ते निघाले आहेत जथ्यांनी
चिरगुटे, बोचकी आणि इथे जमवलेले
किडूक मिडूक उराशी धरून
बायका पोरं म्हातारे कोतारे आणि तरुण
ज्यांना ते आपले घर समजत होते
ते घर सोडून
ज्यांना ते आपले गाव समजत होते
ते गाव सोडून
ते निघाले आहेत
पण त्यांना इथे सोडून जाता येणार नाही
त्यांनी पाहिलेले दुःस्वप्न
ती दहशत, ते हल्ले, ती होरपळ, त्या किंकाळ्या
मग ते काय सोडून
चाललेले आहेत
आणि काय घेऊन.....?



कालनिर्णय

प्रकाशक, कल्पदिग्दर्शन, रेखाचित्र व अक्षरलेखन : [illegible] कुमठ
कविता : प्रभा गणोरकर